REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# पारधी समाजातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक व शैक्षणिक अप्रगतीच्या कारणांचा शोध - एक अभ्यास

श्री. विलास उमराश काळे

**सारांश**



भारतीय संविधानाच्या ४५ व्या कलमानुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व मुले, मुली यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे आवश्यक आहे. केंद्र शासन व राज्य शासनामार्फत शिक्षणाच्या सार्वजनिक कारणासाठी अनेक योजना व उपक्रम राबविले जातात. आदिवासी पारधी समाजातील मुले, मुली शाळेत दाखल होतात मात्र प्राथमिक शिक्षण पुर्ण होण्या अगोदरच शाळा सोडून देतात. जी मुले शाळेत टिकुन राहतात त्यांची शैक्षणिक प्रगती इतराच्या तुलनेने कमी असल्याचे दिसुन येते काही विद्यार्थ्यांची नावे शाळेत आहेत पण शाळेत येत नाहीत ते अध्ययन बाह्य होतात. पारधी समाजामध्ये रुढी, परंपरा, चालीरिती आहेत. अंधश्रध्दा ब-याच प्रमाणात आहे. काही कुटूंबे व्यसनी आहेत. गैरकृत्यामध्ये आढळतात दारु गाळण्यासारखा व्यवसाय करतात, शिकार करतात यामुळे सामाजिक, कौटूंबिक अप्रगती दिसुन येते. या सर्वांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होतो. पारधी समाजातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, सामाजिक, कौटूंबिक अप्रगतीचा विचार प्रस्तुत संशोधनात घेतलेला आहे. संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे. संशोधन समस्येचे संदर्भात माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण सुची साधनांचा वापर केला आहे. संकलित झालेल्या माहितीचे सारणीकरण करुन शेकडेवारी, सरासरी सांख्यीकीचा वापर करुन अन्वयार्थ लावला आहे. प्राथमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या पारधी समाजातील बालकांच्या पालकांची सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. बालकांचा कौटुंबिक, सामाजिक , आर्थिक परिस्थितीचा, बोलीभाषेचा परिणाम शैक्षणिक प्रगतीवर होतो.

प्राथमिक स्तरांमधील पारधी समाजातीन विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी मोफत शैक्षणिक साधने, मोफत गणवेश, पुस्तके देणाऱ्या योजनांची अंमलबजावणी प्राथमिक शाळांमधुन केली जात आहे असे निष्कर्ष संशोधनाअंती आले आहेत.

**प्रास्तविक :-**

(१) ८६ व्या घटनादुरुस्ती नुसार २१ (अ) कलमानुसार शिक्षणाचा मुलभुत हक्कामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणेसाठी शासन स्तरावरुन वेगवेगळे उपक्रम व कार्यक्रम आखले जात आहेत. दि. ०१/०४/२०१० रोजीपासुन बालकांचा मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिकार अधिनियम २००९ लागु करुन त्याची अंमलबजावणी चालु झालेली आहे.

इयत्ता पहिलीत दाखल झालेली सर्व मुले, मुली इयत्ता १० वी पर्यंतचे माध्यमिक शिक्षण पुर्ण करत नाहीत. त्यातील काही मुले, मुली मधूनच शाळा सोडतात. अध्ययन बाह्य होतात पटनोंदणी, उपस्थिती वाढविणे, सर्व विद्यार्थी त्यांचे शिक्षण पुर्ण हाईपर्यंत शाळेत टिकवणे सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण दर्जेदार शिक्षण देणे सर्व विद्यार्थ्यांची गुणवत्तेची पातळी समान करणे अशी ध्येये आहेत तरी ही आदिवासी पारधी समाजातील मुले, मुली प्राथमिक व माध्यमिक शिक्षणापासुन वंचित आहेत. जी बालके प्राथमिक शाळेत दाखल घेऊन शिक्षण घेत आहेत. अशी मुले शिक्षणाच्या प्रवाहात आलेली आहेत. त्यातील प्राथमिक व माध्यमिक स्तरांपर्यंत शिक्षण घेत असताना पुढील शिक्षण घेताना दिसुन येत नाहीत. अशी मुले, मुली शाळा मधुनच सोडणे शाळाबाह्य होणे, अध्ययन बाह्य होताना दिसुन येतात. आदिवासी पारधी समाजातील मुलां मुलींची प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणातील आकडेवारी पाहता अत्यंत कमी आहे. महाराष्ट्रामध्ये १६ शहरे १५ जिल्ह्यामध्ये आदिवासी पारधी समाज जास्त प्रमाणात विखुरलेला आहे वास्तव्यास आहे. आदिवासी पारधी समाजातील मुलां मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी विभाग व शासनाच्या विविध योजना, उपक्रम, कार्यक्रम या पारधी समाजातील विद्यार्थ्यांसाठी आहेत हे त्यांना कितपत

माहित आहे? याचे ज्ञान माहिती नाही. आई वडील, पालक हा पारधी समाज बऱ्याच प्रमाणात गावकुसाबाहेर, गायरान, वनात, जंगलात, डोंगरावर, ओसाड, माळरानावर, गाव वस्तीपासुन लांब दुर राहतो आहे. पारधी समाजातील मुले, मुली शाळेत दाखल होतात परंतु त्यांची शैक्षणिक प्रगती दिसुन येत नाही. त्यांचे प्राथमिक स्तरांपर्यंतचे शिक्षण कसेबसे पुर्ण होते. माध्यमिक स्तरांपर्यंतचे शिक्षण पुर्ण करीत नाहीत ते शाळाबाह्य, अध्ययन बाह्य होतात. त्यांची कारणे ही वेगवेगळी आहेत. त्यातील महत्वाचे कारण म्हणजे शैक्षणिक अप्रगती होय. त्यांची बोलिभाषा पारधी ही आहे.पारधी बोलिभाषा ही मराठी, तामिळ, कन्नड, ऊर्दु, गुजराती, भाषेची सरमिसळ आहे. या भाषांचा प्रभाव बोलिभाषेवर पडलेला आहे. भाषा हे संवाद साधण्याचे, आत्मप्रकटीकरणाचे प्रभावी साधन आहे. शिक्षण आत्मसात करण्याचे साधन आहे. शाळेत शिक्षणाची भाषा, प्रमाणभाषा आहे. अधिवासी पारधी समाजातील बालकांची बोली भाषा व शिक्षणाची प्रमाणभाषा यांचा समन्वय साधला जात नाही. अध्ययान मध्ये अडचणी निर्माण होतात. त्यांचे मध्ये न्युनगंड निर्माण होतो. त्यामुळे ही मुले, मुली प्राथमिक, माध्यमिक शिक्षण पुर्ण करीत नाहीत उच्च शिक्षण हा दुरचा प्रवास आहे. अधिवासी पारधी जमातीतील पालकांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक धार्मिक परिस्थिती रुढी, परंपरा, भुत, पिशाच्च, व्यसनाधिनता फोफावलेल्या आहेत. अज्ञानपणा निरीक्षरता आहे. द्रारिद्यामुळे, मागासलेपणामुळे वंचित असल्याने अन्न, पाणी, निवारा उदरनिर्वाहासाठी सततची भटकंती स्थलांतरणामुळे शिक्षणाचा अभाव आहे. इतर प्रगत समाजाकडून अन्यायाची, संशयाची, असमानतेची, वागणुक मिळते, गृह खाते, पोलीस यांचेकडून सतत संशयास्पद वागणुक दिली जाते. या सर्वांवर कोंडी फोडण्यासाठी शिक्षण हा प्राथमिक व मुलभुत स्वरुपाचा उपाय आहे. शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. सोलापूर जिल्ह्यातील आदिवासी पारधी जमातीचा शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक, आर्थिक विकास झालेला दिसुन येत नाही. सामाजिक जीवनामध्ये जीवन जगताना व्यसनी, गावकुसाबाहेर जीवन जगणे, प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची ठोस मदत न मिळणे, दैनंदिन गरजा उदरनिर्वाहासाठी वाम मार्गाचा अवलंब करणे इतर प्रगत समाजात सामिल झाले तर सामावुन न घेणे, संशयास्पद वागणुक देणे, समाजामध्ये कलुषित भावना निर्माण होणे या सर्वांचा परिणाम मुलां मुलींच्या शिक्षणावर होताना दिसुन येत आहे.

त्यामळेच आदिवासी पारधी जमातीतील बालकांना शिक्षण घेत असताना कोणत्या अडचणी येतात ? सामाजिक प्रगती का दिसुन आलेली नाही. ? याचा अभ्यास करावा लागेल शासनाकडून आदिवासी विभागाकडुन कोणकोणत्या योजना पुरविल्या त्याचा काय परिणाम झ ाला ? विद्यार्थी लाभाच्या योजना राबविताना कोणकोणत्या अडचणी येतात ? सांस्कृतीक प्रगती का दिसुन आली नाही ? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा एक प्रयत्न शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करुन संशोधन करण्याचा प्रयत्न आहे.

## (२) संशोधन समस्या विधान :-

**पारधी समाजातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक व शैक्षणिक अप्रगतीच्या कारणांचा शोध - एक अभ्यास**

## (३) संशोधनाची उद्दिष्टे :-

(१) प्राथमिक स्तरांमधील पारधी समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अप्रगतीच्या कारणांचा शोध घेणे.
(२) प्राथमिक स्तरांमधील पारधी समाजातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक, कौटुंबिक स्थितीचा अभ्यास करणे.
(३) प्राथमिक स्तरांमधील पारधी समाजातील विद्यार्थ्यांच्या लाभाच्या योजनांचा अभ्यास करणे.
(४) प्राथमिक स्तरांमधील पारधी समाजातील विद्यार्थ्याच्या शैक्षणिक, सामाजिक कौटूंबिक प्रगतीसाठी उपाय योजना सुचविणे.

## (४) संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन समस्या वर्तमान काळाशी निगडीत असल्याने संशोधकाने वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

## (५) नमुना निवड :-

प्रस्तुत संशोधन माढा तालुक्यातील २९५ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील प्राथमिक स्तरांमधील विद्यार्थ्यांचे आहे. यापैकी पारधी समाजातील विद्यार्थी शिकत असलेल्या १२ जिल्हा परिषद शाळांच्या मुख्याध्यापकांची निवड करण्यात आली. पारधी समाजातील ५७ विद्यार्थ्यांपैकी २६ विद्यार्थ्यांची यादृच्छिक नमुना निवड लॉटरी पध्दतीने करण्यात आली. ५ विद्यार्थी व ५ पालकांची मुलाखतीसाठी निवड करण्यात आली.

## (६) संशोधनाची साधने व तंत्रे :-

प्रस्तुत संशोधनाबाबत सविस्तर माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली या प्रमुख साधनांचा वापर करण्यात आला.विद्यार्थ्यांची प्रगती पत्रक, उपस्थितीपत्रक व शैक्षणिक, सामाजिक अडचणी समजुन घेण्यासाठी निरिक्षण तंत्राचा वापर करण्यात आला.

## (७) संशोधनाची कार्यपध्दती :-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पारधी समाजातील विद्यार्थी शिकत असलेल्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांकडून पारधी समाजातील विद्यार्थ्यांबाबत माहिती मिळविण्यासाठी संरचित उद्दीष्टाधिष्टीत १६ प्रश्नांची प्रश्नावली तयार केली १३ प्रश्न बंदिस्त व ३ प्रश्न मुक्त होते. विद्यार्थ्यांच्या पालकांची मुलाखत घेण्यासाठी १२ प्रश्नांचा समावेश केला होता. निरीक्षणासाठी ११ मुद्दे निश्चित करण्यात आले. प्रश्नावली व मुलाखतीतून मिळविलेल्या माहितीची सत्यता व इतर सामाजिक, कौटूंबिक माहिती मिळविण्यासाठी निरीक्षण तंत्राचा वापर केला. निरीक्षण सुचीमध्ये ११ मुद्यांचा समावेश केला होता. प्रस्तुत प्रश्नावली मुलाखत सुची निरीक्षण तंत्राची सुची ५ शिक्षणशास्त्रातील तज्ञांकडून तपासुन घेतली. तज्ञांनी दिलेल्या सुचना विचारात घेऊन अंतिम प्रश्नावली, मुलाखत सुची व निरीक्षण तंत्राचे मुद्दे तयार केले. सदर प्रश्नावली माढा तालुक्यातील पारधी समाजातील विद्यार्थी शिकत असलेल्या १२ शाळांच्या मुख्याध्यापकांना देण्यात आली. ५ विद्यार्थी व ५ पालकांची मुलाखत घेण्यात आली. ५ कुटूंबाचे निरीक्षण सुचीव्दारे निरीक्षण नोंदविण्यात आले. त्याच बरोबर पारधी समाजातील मुलांच्या प्रगतीच्या कागदपत्रांची उपस्थिती पत्रकांची पाहणी केली या संशोधन विषयासाठी संकलित केलेल्या माहितीच्या विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी कोष्टके तसेच सरासरी व शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर केला त्यावर अधारीत निष्कर्ष काढण्यात आले.

## (८) निष्कर्ष :-

(१) एक्कावन्न टक्के पारधी समाजातील विद्यार्थी अप्रगत आहेत.
(२) बासष्ट टक्के पारधी समाजातील मुलांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे.
(३) बावीस टक्के पारधी समाजातील विद्यार्थी अनियमित उपस्थित असतात.
(४) बाहत्तर टक्के पारधी समाजातील विद्यार्थ्यांवर सामाजिक परिस्थितीचा परिणाम झालेला आहे.
(५) अठ्ठावन्न टक्के पालक हे अंधश्रध्दा रुढी परंपरा पाळतात.
(६) शहात्तर टक्के पारधी समाजातील मुलींवर सामाजिक, कौटूंबिक परिस्थितीमुळे शैक्षणिक अप्रगती आहे.
(७) छपन्न टक्के शाळांमध्ये उपचारात्मक जादा वर्गाध्यापन केले जाते.
(८) सर्वच शाळांमध्ये पारधी समाजातील मुलांमुलींच्या गणवेश वाटप, पुस्तके वाटप योजना राबविली जाते.

## (९) शिफारशी :-

(१) शैक्षणिक सर्वेक्षण करुन १०० % पट नोंदणी करावी.
(२) पारधी समाजातील मुलांच्या पालकांना शासकीय विविध योजना, लाभांच्या योजना, शिष्यवृत्ती यांची प्रत्यक्ष पाहणी करुन प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी सर्व शाळा प्रमुखांनी पुढाकार घ्यावा.
(३) पारधी समाजातील मुले, मुली आई, वडील व पालक यांचे प्रबोधनासाठी शिबिरे, आयोजित करावीत. तालुका, गाव पातळीवर समुपदेशक नेमावा.
(४) पारधी समाजाचे सामाजिक, आर्थिक स्तर उंचावणेसाठी स्वयंसेवी संस्था, शासना मार्फत जनजागरण करावे. पालकांना उद्‌बोधन करावे, आर्थिक अडचणी सोडवाव्यात.
(५) पारधी समाजातील विद्यार्थ्यांसाठी जादा उपचारात्मक वर्ग घेऊन शैक्षणिक प्रगती करावी.
(६) पारधी समाजातील कुटूंबाना मोफत आहे तेथेच घरे बांधुन द्यावीत.
(७) पारधी समाजाकडे संशयित गुन्हेगार समाज म्हणुन न पाहता सहानुभुतीचे, मदतीचे वातावरण तयार करावे याकामी समाजसेवक, स्वंयसेवी संस्था, लोकप्रतिनीधी, पारधी समाजातील कार्यकर्ते यांनी पुढाकार घ्यावा.

## संदर्भ ग्रंथ सुची.


(१) गारे गोविंद, (२००९),आदिवासींचे शिक्षण, औरंगाबाद : साकेत प्रकाशन.
(२) गारे गोविंद,(२०१२),महाराष्ट्रातील आदिवासी जमाती,पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन.
(३) फडके सुधीर, (१९६३), महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, पुणे : जोशी आणि लोखंडे प्रकाशन.
(४) भिंताडे वि.रा., (२००६), शैक्षणिक संशोधन व्दितीय आवृत्ती, पुणे : नित्यनुतन प्रकाशन.
(५) लोटे रा.ना.,(जुन २०१०),आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, नागपुर : पिंपळापुरे पब्लीशर्स.
(६) www.maha. Gov. in
(७) www. Youtub.com